सरळसेवाप्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू नामावली विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 6 ऑगस्ट 1997

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब, दिनांक 29 मार्च, 1997.

शासन निर्णय :- उपरोक्त दिनांक 29 मार्च, 1997 च्या शासन निर्णयान्वये, सरळसेवा भरतीसाठी तसेच पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू नामावली विहित करण्यात आली आहे. या संदर्भात काही नियुक्ती प्राधिकारी, यांचेकडून काही मुद्यांबाबत विचारणा करण्यात आल्याने, त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(1) सरळसेवा भरतीसाठी अपंग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त तसेच महिला यांना शासकीय सेवेत देण्यात आलेले आरक्षण समांतर असल्यामुळे त्यांना बिंदू नामावलीत दर्शविण्यात येणार नाही. मात्र, त्या त्या प्रवर्गात टक्केवारीनुसार, पदे आरक्षित करण्यासंबंधीची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी.

(2) दिनांक 15 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या बिंदू नामावलीचा अवलंब करण्यात आला असल्यास, दिनांक 29 मार्च, 1997 च्या शासन निर्णयामधील आदेशानुसार सुधारित बिंदू नामावलीतील त्यापुढील बिंदूपासून अवलंब करण्यात यावा. मात्र, जर दिनांक 15 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयाअन्वये विहित करण्यात आलेल्या, तात्पुरत्या बिंदू नामावलीचा अवलंब करण्याचा प्रसंग दरम्यानच्या काळात आला नसेल तर, सुधारित बिंदू नामावलीचा बिंदू क्र.1 पासून अवलंब करण्यात यावा.

(3) समक्रमांकाच्या, दिनांक 29 मार्च, 1997 च्या शासन निर्णय (रोटा प्रत) सोबतच्या 50 बिंदू नामावलीमध्ये बिंदू क्रमांक 13 येथे अनुसूचित जाती असे अनवधानाने नमूद करण्यात आले आहे. सदर बिंदू अनुसूचित जमातीकरिता राखीव आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बुध्दिराजा,
प्रधान सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने

---

एच-952 (5,000-9-97)